RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# मोफत व सक्तीचे शिक्षण देणाऱ्या अधिनियमाचे लाभ

**डॉ. अवघडे आर. एस.**
श्री समर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च (बी.एड.)
म्हसणे फाटा, ता. पारनेर, जि. अहमदनगर

**प्रस्तावना**

केंद्र सरकारने सन 2002 च्या 86 व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद 21 (ए) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम Right of children to Free and compulsory Education Act] 2009 (No.35, 2009) केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या 27.08.2009 च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे. तसेच भारत सरकारच्या दिनांक 16.02.2010 च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक 01.04.2010 पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केले असल्याचे नमूद केले आहे.

समता सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये, सर्व मूलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जावू शकतात, यादृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनावर आली आहे.

केंद्र शासनाने पारित केलेला कायदा राज्यात लागू झाला असल्यामुळे त्या कायद्यातील सर्व तरतुदीचे पालन करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक संस्था, शाळा, मुख्याध्यापक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास हा अधिनियम आणून देण्यात यावा.

सदर अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सन 2009–10 या शैक्षणिक वर्षात इयत्ता 1ली ते 8वी पर्यंत परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शासनाकडे करण्यात आलेली विचारणा लक्षात घेऊन खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे. उपरोक्त अधिनियमातील कलम 16 मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, 'शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास मागे ठेवता येणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही.' तसेच कलम 30 (1) मध्ये अशी तरतूद करण्यात आली की 'कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पर्ण होईपर्यंत मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.' या तरतुदी विचारात घेऊन असे निर्देश देण्यात येत आहेत की, इयत्ता 1ली ते इयत्ता 8 वी या वर्गातील, सन 2009–10 च्या परीक्षांमध्ये शाळांनी घोषित केलेल्या निकालात, ज्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण घोषित केले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांना सन 2010–11 या शैक्षणिक वर्षात पुढील वर्गात प्रवेश देण्यात यावा. तसेच अनुत्तीर्ण किंवा कोणत्याही कारणास्तव बालकांस शाळेतून काढून टाकता येणार नाही.

अनुत्तीर्ण दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संपादणूक ज्या विषयामध्ये समाधानकारक नसेल त्या विषयातील त्यांची संपादणूक अपेक्षित पातळीवर आणण्यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार 2009 पासून राज्यात रूजू झाला. भारताच्या मूळ राजपत्रामध्ये 38 कलमे समाविष्ठ असून त्याच्या **प्रकरण 2** मध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

1. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

2. प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश न घेतलेल्या किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण न केलेल्या बालकांसाठी विशेष तरतुदी

**प्रकरण 03** – समुचित सरकार, स्थानिक प्राधिकरण आणि आईवडील यांची कर्तव्ये. यामध्ये समुचित सरकार व स्थानिक प्राधिकरणे यांचे शाळा स्थापन करण्याचे कर्तव्य, वित्तीय व इतर जबाबदाऱ्या, समुचित सरकारने शाळापूर्व शिक्षणाची तरतुद करणे.

**प्रकरण 04** – शाळांच्या शिक्षकांच्या जबाबदाऱ्या

1. मोफत व सक्तीच्या शिक्षणाबाबत शाळेच्या जबाबदारीची व्याप्ती.
2. प्रवेशासाठी कोणतेही प्रतिव्यक्ती (कॅपिटेशन) शुल्क किंवा चाळणी पध्दती नसणे.
3. प्रवेश देण्यास नकार न देणे.
4. मागच्या वर्गात ठेवण्यास व शाळेतून काढून टाकण्यास प्रतिबंध
5. बालकांस शारीरिक शिक्षा करण्यास किंवा मानसिक त्रास देण्यास प्रतिबंध
6. मान्यता प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय कोणतीही शाळा स्थापन न करणे.
7. केंद्र सरकार अनुसूचीमध्ये कोणतीही मानके व प्रमाणके यांची भर घालून किंवा ती वगळून राजपत्रातील अधिसूचनेव्दारे अनुसूचीमध्ये सुधारणा करू शकेल.
8. कलम 2 च्या खंड (न) च्या उपकलम (4) मध्ये विनिर्दिश्ट केलेल्या शाळेखरीज इतर शाळा एक शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करील.
9. कलम 21 च्या पोटकलम (1) अन्वये स्थापन केलेल्या प्रत्येक शाळा व्यवस्थापन समिती शाळा विकास योजना तयार करतील.
10. विद्यार्थी शिक्षक प्रमाण ठरविणे.

**प्रकरण 05** – प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व तो पूर्ण करणे.

अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रिया पोटकलम (1) च्या बाबी विचाराधिन घेऊन कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक नाही.

**प्रकरण 06** – बालकांच्या हक्कांचे संरक्षण

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, 2005 (2006 चा 4) यांच्या कलम 3 अन्वये स्थापन केलेला राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगला अधिनियमान्वये त्यांना नेमून दिलेल्या कामांव्यतिरिक्त कामे पार पाडावी लागतात.

(1) (अ) या अधिनियमांव्दारे किंवा त्याअन्वये तरतूद केलेल्या हक्कांबाबत संरक्षक उपाययोजनांची तपासणी करणे व त्यांचा आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजना करण्याची शिफारस करणे. (ब) बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कांशी संबंधित तक्रारींची चौकशी करणे. आणि (क) उक्त बालहक्क संरक्षण आयोग अधिनियमाच्या कलम 15 व 24 या अन्वये तरतूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या उपाययोजना करणे.

(2) उक्त आयोगांना पोटकलम (1) च्या खंड (क) अन्वये बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कांशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींची चौकशी करताना, उक्त बालहक्क संरक्षण आयोग अधिनियमाच्या कलम 14 व 24 अन्वये त्यांना अनुक्रमे जे अधिकार नेमून दिलेले असतील तेच अधिकार असतील.

(3) एखाद्या राज्यामध्ये राज्य बालहक्क संरक्षण आयोग स्थापन करण्यात आला नसेल त्याबाबतीत, समुचित सरकारला पोटकलम (1) च्या खंड (अ) ते (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कामे पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, विहीत करण्यात येईल अशा रितीने व अशा अटी व शर्तींना अधीन राहून, असे प्राधिकरण स्थापन करता येईल.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

**गाऱ्हाण्यांचे निवारण**

(1) कलम (31) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमांन्वये कोणत्याही व्यक्तीला एखाद्या बालकाच्या हक्कांशी संबंधित असलेले कोणतेही गाऱ्हाणे मांडावयाचे असल्यास, ती व्यक्ती अधिकारिता असलेल्या स्थानिक प्राधिकरणाकडे लेखी तक्रार करू शकेल.

(2) पोटकलम (1) खालील तक्रार मिळाल्यावर स्थानिक प्राधिकरण, संबंधित पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, तीन महिन्यांच्या कालावधीत त्या गाऱ्हाण्यांवर निर्णय देईल.

(3) स्थानिक प्राधिकरणाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य बालहक्क संरक्षण आयोगाकडे, किंवा यथास्थिती कलम 31 च्या पोटकलम 3 अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडे अपिल करता येईल.

(4) पोटकलम 3 वर केलेल्या अपिलावर, कलम 31च्या पोटकलम 1 च्या खंड (क) अन्वये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार, राज्य बालहक्क संरक्षण आयोगाकडून किंवा यथास्थिती, कलम 31 च्या पोटकलम (3) अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडून निर्णय देण्यात येईल.

**राष्ट्रीय सल्लागार परिषद स्थापन करणे**

(1) केंद्र सरकार, प्राथमिक शिक्षण व बालविकास क्षेत्रातील ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून नेमणूक करावयाच्या, केंद्र सरकारा आवश्यक वाटतील अशा, परंतु पंधरापेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांनी मिळून बनलेली राष्ट्रीय सल्लागार परिषद अधिसूचनेव्दारे स्थापन करील.

(2)या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजवणी करण्यासाठी केंद्र सरकारला सल्ला देणे हे राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे काम असेल.

(3) राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या सदस्यांचे भत्ते आणि त्यांच्या नेमणूकीच्या इतर अटी व शर्ती, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**राज्य सल्लागार परिषद स्थापन करणे**

(1) राज्य शासन, प्राथमिक शिक्षण व बाल विकास या क्षेत्रातील ज्ञान व अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून करावयाच्या, राज्य शासनास आवश्यक वाटतील अशा परंतु पंधरा पेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांनी मिळून बनलेली राज्य सल्लागार परिषद अधिसूचनेव्दारे स्थापन करील.

(2) या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाला सल्ला देणे हे राज्य सल्लागार परिषदेचे काम असेल.

(3) राज्य सल्लागार परिषदेच्या सदस्यांचे भत्ते आणि त्यांच्या नेमणूकीच्या इतर अटी व शर्ती, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**शाळेची मानके व प्रमाणके**

**1. शिक्षकांची संख्या**

**(अ) इयत्ता पहिली ते पाचवीसाठी**

| प्रवेश देण्यात आलेली बालके | शिक्षकांची संख्या |
|---|---|
| 1. साठपर्यंत | – दोन |
| 2. एकसष्ठ ते नव्वद | – तीन |
| 3. एक्याण्णव ते एकशेवीस | – चार |
| 4. एकशे एकवीस ते दोनशे | – पाच |
| 5. एकशे पन्नास पेक्षा अधिक | – पाच व एक मुख्याध्यापक |
| 6. दोनशे पेक्षा अधिक | – विद्यार्थी शिक्षक प्रमाण (मुख्याध्यापक वगळून) चाळीस पेक्षा अधिक नसलेले |

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

**(ब) इयत्ता सहावी ते आठवीसाठी**

(1) प्रत्येक इयत्तेसाठी किमान एक शिक्षक जेणेकरून पुढील विषयांसाठी किमान एक शिक्षक असेल – 1. विज्ञान व गणित, 2. सामाजिक अभ्यास, 3. भाषा

(2) प्रत्येकी 35 बालकांसाठी किमान एक शिक्षक

(3) 100 पेक्षा अधिक बालकांना प्रवेश दिला जातो तेथे – पूर्ण वेळ मुख्याध्यापक, पुढील विषयांसाठी अंशकालिक शिक्षक – 1. कलाशिक्षण, 2. आरोग्य व शारीरिक शिक्षण 3. कार्यानुभव.

**2. इमारत**

पुढील बाबींचा समावेश असलेली पक्की इमारत

1. प्रत्यक शिक्षकासाठी किमान एक वर्गखोली आणि कार्यालय नि भांडार नि मुख्याध्यापकांसाठी खोली
2. अडथळाहिन प्रवेशमार्ग
3. मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह
4. सर्व बालकांसाठी स्वच्छ व पुरेसे पेयजल पुरविण्याची सुविधा
5. ज्या शाळेत मध्यान्ह भोजन शिजविले जाते तेथे एक स्वयंपाक घर
6. क्रिडांगण
7. शाळेच्या इमारतीच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंत किंवा कुंपन घालून केलेली व्यवस्था.

**3. शैक्षणिक वर्षामधील कामाचे दिवस / अध्यापनाचे तास**

1. इयत्ता पहिली ते पाचवीसाठीसाठी कामाचे दोनशे दिवस
2. इयत्ता सहावी ते आठवीसाठी कामाचे दोनशे वीस दिवस
3. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात अध्यापनाचे आठशे तास
4. इयत्ता सहावी ते आठवीसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात अध्यापनाचे हजार तास.

**4. शिक्षकासाठी प्रत्येक आठवडयाला कामाचे किमान तास**

पाठाची तयारी करण्यासह अध्यापनाचे पंचेचाळीस तास

**5. अध्यापन व अध्ययन सामग्री**

प्रत्येक इयत्तेच्या गरजेनुरूप देण्यात येईल.

**6. ग्रंथालय**

प्रत्येक शाळेमध्ये, वृत्तपत्रे, मासिके व गोष्टीच्या पुस्तकांसह सर्व विषयांवरील पुस्तके पुरविणारे एक ग्रंथालय असेल.

**7. खेळण्याचे साहित्य, खेळ व क्रिडाविषयक सामग्री**

प्रत्येक इयत्तेच्या गरजेनुरूप देण्यात येईल.

वरील सर्व सैध्दांतिक माहितीवरून हे लक्षात येते कि याचे लाभ पुढील प्रमाणे आहेत.

**शिक्षण अधिनियमाचे लाभ**

1. वंचित व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी राखीव जागा (25टक्के)
2. शाळाबाहय मुलांना नियमित शाळेत दाखल करणे व उपस्थिती टिकवून ठेवणे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

3. देहविक्री करणाऱ्या महिला व तृतीयपंथी यांच्या मुलांना शाळेबाबत प्रवेश देण्याबाबत
4. राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक / माध्यमिक शाळेची तपासणी
5. तपासणीकरीता फिरती पथके स्थापन करणे.
6. तक्रार निवारण यंत्रणा गठित करणे.
7. शाळांमध्ये मुलभूत सुविधांबाबतचे निकष ठरविणे.
8. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येवर आधारावर शिक्षक पदे निर्धारित करणे.
9. TET परीक्षा प्राथमिक शिक्षकांकरीता अनिवार्य करणेबाबत
10. राज्यातील सर्व शाळांकरीता इयत्ता 1 ली ते 12 वी पर्यंत स्थानिक प्राधिकरण व सक्षम अधिकारी घोषित करणे.
11. इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वीतील अनुतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देणे व त्यांची संपादणूक पातळी वाढविणे.
12. अधिनियम अंतर्गत प्राधिकारी घोषित करणे.
13. सर्व प्राथमिक शिक्षकांनी प्रशिक्षित होणे.
14. सर्व शिक्षा अभियानातर्फे मोफत गणवेश पुरविणे.
15. शिक्षण अधिनियमानुसार अनधिकृत शाळांविरूध्द कारवाई
16. प्राथमिक शिक्षणाची व्याख्या व स्तर (इयत्ता 1ली ते 8 वी) Elementary cycle मध्ये सुधारणा
17. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांतील पटसंख्येच्या
18. शाळांमध्ये मूलभूत सुविधांबाबतचे निकष ठरविणेबाबत

विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम 1995 (1996 चा 01) यांच्या कलम 2 च्या खंड (क) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे विकलांगतेने पीडित असलेल्या बालकास उक्त नियमांच्या प्रकरण 05 च्या तरतुदीनुसार मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण घेण्याचा हक्क असेल.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की,



ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

या सर्वांना झालेला दिसून येतो. त्यामुळे सर्व सामान्य जनतेला दिलासं प्राप्त होऊन शिक्षण हक्क प्राप्त झालेला आहे.

**संदर्भ**

1. Right of children to free & compulsory Education Act 2009